आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता

१८ मे २०२४ - शनिवार

**ठळक बातम्या**

- लोकसभा निवडणुकीच्या राज्यातल्या पाचव्या आणि अंतिम टप्प्याच्या प्रचाराची सांगता / येत्या सोमवारी १३ जागांवर मतदान
- संविधानानं दिलेलं आणि आर्थिक मागासांचं आरक्षण कायम ठेवण्याचं इंडिया आघाडीचं आश्वासन, सर्वधर्मीयांच्या धार्मिक स्थळांचा आदर करणार असल्याचीही ग्वाही
- गेल्या वेळेपेक्षा जास्त जागा निवडून येतील, असा विश्वास मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडून व्यक्त

  **आणि**

- बँकॉकमध्ये थायलंड ओपन बॅडमिंटन स्पर्धेत भारताच्या चिराग शेट्टी आणि सात्विक साईराज रँकीरेड्डी यांची पुरुष दुहेरीच्या अंतिम फेरीत धडक

**<><><><><>**

लोकसभा निवडणुकीच्या राज्यातल्या शेवटच्या टप्प्याच्या प्रचाराची आज सांगता झाली. राज्यात आज मुंबईतल्या सर्व ६ जागा यांच्यासह ठाणे, कल्याण, भिवंडी, पालघर, नाशिक, दिंडोरी आणि धुळे या १३ लोकसभा मतदारसंघात सोमवारी मतदान होणार आहे. या टप्प्यातल्या मतदानासाठी २४ हजार ५७९ मतदान केंद्र तयार करण्यात आले आहेत. राज्यातल्या १३ मतदारसंघांत दोन कोटी ४६ लाख ६९ हजार ५४४ मतदार, आपला मतदानाचा हक्क बजावणार आहेत, तर २६४ उमेदवार निवडणूक रिंगणात आहेत. त्यांच्यासाठी एकूण २४

हजार ५७९ मतदान केंद्र कार्यरत राहणार आहे. सर्वाधिक ३१ उमेदवार नाशिकमध्ये तर सर्वात कमी १० उमेदवार दिंडोरी आणि पालघरमध्ये आहेत.

**<><><><><>**

संविधानानं दिलेलं आणि आर्थिक मागासांना दिलेलं आरक्षण कायम ठेवण्यासोबत राज्याराज्यातून आलेल्या आरक्षणांच्या प्रस्तावावर संबंधित आयोगांच्या शिफारसींनुसार योग्य निर्णय घेऊ असं आश्वासन काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी आज मुंबईत इंडीया आघाडीच्या वार्ताहर परिषदेत दिलं. आम्ही UPA सरकारच्या काळात देशात अन्न सुरक्षा कायदा आणला आहे. पुन्हा सत्तेत आल्यावर १० किलो धान्य मोफत देऊ आणि GST चा एकच दर लागू करू, असंही ते म्हणाले. सध्या निवडणूक जनतेची असून जनता ती लढते आहे. त्यामुळे राज्यातल्या ४८ पैकी सुमारे ४६ जागा महाविकास आघाडीला मिळतील असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. देशातल्या सर्व जातीधर्माच्या सर्व संस्था आणि वास्तूंचा सन्मान आमचं सरकार करेल, असं आश्वासन यावेळी शरद पवार यांनी दिलं. तर अयोध्येतील राम मंदिराच बांधकाम अपूर्ण असून आम्ही सत्तेत आल्यानंतर ते पूर्ण करू अशी ग्वाही उद्धव ठाकरे यांनी दिली. ४ जून पासून या देशात इंडिया आघाडीचे सरकार येईल आणि खऱ्या अर्थाने अच्छेदिन सुरू होतील, असंही ठाकरे म्हणाले. इंडिया आघाडीच्या बैठकीत प्रधानमंत्री पदाचा चेहरा ठरला आहे. त्यासाठी आमच्याकडे अनेक जण असल्याचे ठाकरे यांनी सांगितलं.

**<><><><><>**

आताची काँग्रेस ही महात्मा गांधी, सरदार पटेल यांची काँग्रेस नसून राहुल आणि सोनिया गांधी यांची काँग्रेस आहे. काँग्रेसच्या जाहीरनाम्यात मुस्लिम लीगची छाप आहे, असा आरोप उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी आज केला. धुळे इथं महायुतीचे उमेदवार सुभाष भामरे यांच्या प्रचारार्थ आयोजित सभेत ते बोलत होते. अनुसुचीत जाती आणि जमातीचं आरक्षण मुस्लिमांना देण्याचं आश्वासन काँग्रेसने दिलं आहे. तसंच वारसा कर लागू करून तुमची अर्धी संपत्ती अल्पसंख्यांना देण्याचा काँग्रेसचा विचार आहे, अशी टीकाही आदित्यनाथ यांनी केली. या सभेला भाजपाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, मंत्री दादा भुसे उपस्थित होते.

**<><><><><>**

नाशिक जिल्ह्यातला कांद्याचा प्रश्न सोडवण्यासाठी अनेक अडचणी आहेत. त्यावर लोकसभा निवडणुकीनंतर तोडगा काढण्यात येईल, अशी ग्वाही केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी आज दिली. नाशिक आणि दिंडोरी मतदारसंघातल्या महायुतीच्या उमेदवारांच्या प्रचारार्थ चांदवड आणि नाशिक इथं सभा झाल्या. यावेळी ते बोलत होते.

**<><><><><>**

लोकसभा निवडणुकीच्या पाचव्या टप्प्याच्या प्रचाराची आज सांगता झाल्यावर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शिवसेनाप्रमुख दिवंगत बाळासाहेब ठाकरे यांच्या स्मृतीस्थळाचं दर्शन घेतलं. महायुतीच्या राज्यात मागील वेळेपेक्षा जास्त जागा निवडून येतील असा विश्वास मुख्यमंत्र्यांनी यावेळी व्यक्त केला. आपल्याला

लोकांचा चांगला प्रतिसाद मिळत आहे. त्यामुळे महायुतीचा विजय निश्चित असल्याचं मुख्यमंत्री शिंदे म्हणाले.

**<><><><><>**

भाजपा-रालोआने ४०० जागांवर विजय मिळवला तर देशाचे संविधान धोक्यात येईल असा आरोप करणाऱ्या काँग्रेसला ते सत्तेत असताना अनेक वेळा घटनेत दुरुस्त्या केल्याचा सोयीस्कररित्या विसर पडतो. आणीबाणी लागू करून संविधान, लोकशाहीचा गळा घोटण्याचे काम काँग्रेसनेच केले होते, असा आरोप मध्य प्रदेशचे मुख्यमंत्री मोहन यादव यांनी शनिवारी केला. भारतीय जनता पार्टीच्या प्रदेश कार्यालयात झालेल्या पत्रकार परिषदेत ते बोलत होते.

बहुमताच्या बळावर मागच्या १० वर्षांत भाजपा-रालोआ सरकारने केलेल्या विकासकामांमुळे आमच्यावर टीका करता येत नसल्याने विरोधक अपप्रचार करत फिरत आहेत. विरोधक समजतात तशी जनता दुधखुळी नाही. मतदानाच्या पाचव्या टप्प्यात विकसित भारतासाठी भाजपा-रालोआ आणि महायुतीच्या उमेदवारांना मत देऊन मतदार विरोधकांना धडा शिकवतील असा विश्वास यादव यांनी व्यक्त केला.

**<><><><><>**

मतदान केंद्राच्या १०० मीटर परिसरात मोबाईल आणण्याची अनुमती नाही, ही स्पष्ट आणि महत्त्वाची सूचना आहे,' असं मुंबई उपनगरचे जिल्हाधिकारी आणि जिल्हा निवडणूक अधिकारी राजेंद्र क्षीरसागर यांनी म्हटलं आहे. ते आज घेतलेल्या पत्रकार परिषदेत बोलत होते. यावेळी त्यांच्या उपस्थितीत लो फ्लोअर इलेक्ट्रीक

व्हिलचेअर ॲक्सेसीबल बस आणि व्हिलचेअर ॲक्सेसीबल टॅक्सींचं उद्घघाटन करण्यात आलं.

**<><><><><>**

लोकसभा निवडणुकीच्या पाचव्या टप्प्यात जास्तीत जास्त नागरिकांनी मतदानासाठी बाहेर पडावं, यासाठी विविध प्रयत्न केले जात आहेत. मुंबईच्या मॅजेस्टिक बुक डेपोने मतदान करणाऱ्या वाचकांना २० ते २५ मे या कालावधीत पुस्तक खरेदीवर २० टक्के सवलत देण्याची घोषणा केली आहे.

मतदानाची शाई लावल्याचं बोट दाखवून गिरगाव, दादर आणि ठाणे अशा तिन्ही शाखांमध्ये या सवलतीचा लाभ घेता येईल. तसंच भारतीय राष्ट्रीय उपहारगृह संघटनेच्या मुंबई शाखेनेही २० आणि २१ मे रोजी ‘लोकशाही सवलत’ देण्याचा निर्णय घेतला आहे.

**<><><><><>**

नागरिकांच्या प्रश्नांवर कळकळीनं काम करणाऱ्या सर्व समाज घटकांप्रती समानतेचा भाव असणाऱ्या सरकारसाठी मुंबईकर मतदार बंधू-भगिनींनी निर्भयपणे मतदान करा. सत्ता परिवर्तनाची ताकद आपल्या विचारी मतदानात आहे. आपलं मत वाया घालवू नका. असं आवाहन लेखक, कलावंत, माजी प्रशासक, सामाजिक कार्यकर्ते आणि विवेकवादी नागरिकांच्या गटानं केलं आहे.

सध्याच्या खालवलेल्या सामाजिक, राजकीय आणि आर्थिक परिस्थितीमध्ये जनहिताच्या दृष्टीने सकारात्मक बदल घडवून आणण्यासाठी हे आवाहन करत

असल्याचं या गटानं म्हटलं आहे. न्यायमूर्ती राजन कोचर, रामदास भटकळ, किशोर कदम, उर्मिला पवार, प्रेमानंद गज्वी, नीरजा, सिसिलिया कार्व्हालो, उषा मेहता या लेखक, विचारवंतांसह इतर मान्यवरांचा समावेश आवाहनकर्त्यांमध्ये आहे

**<><><><><>**

पंढरपूरमध्ये येत्या दोन जून पासून विठ्ठलाचं थेट पदस्पर्श दर्शन सुरू करण्यात येणार आहे. मंदिर व्यवस्थापन समितीनं हा निर्णय घेतल्याचं, समितीचे सहअध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी सांगितलं. मंदिरातील गाभाऱ्याच्या संवर्धन कामासाठी १५ मार्चपासून विठ्ठलाचं पदस्पर्श दर्शन बंद आहे. या काळात मुखदर्शनही दिवसातून फक्त पाच तास सुरू आहे. येत्या सात जुलैपासून विठ्ठलाचे आषाढीसाठी २४ तास दर्शन सुरू असणार आहे माहिती मंदिर व्यवस्थापन समितीनं दिली आहे.

**<><><><><>**

पुण्याच्या भारतीय चित्रपट आणि दूरचित्रवाणी संस्थेच्या विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या 'सनफ्लावर्स वर फर्स्ट वन्स टू नो' हा चित्रपट सध्या कान्स महोत्सवात सध्या सहभागी झाला आहे. या चित्रपटाच्या प्रक्रियेबद्दल आणि अनुभवाबद्दल ऐकूया या चित्रपटाचे नेपथ्यकार प्रणव खोत यांच्याकडून.

**होल्ड--बाइट--(२२ सेकंद)**

**<><><><><>**

बॅंकॉकमध्ये थायलंड खुल्या बॅडमिंटन स्पर्धेत भारताच्या चिराग शेट्टी आणि सात्विक साईराज रँकीरेड्डी यांनी पुरुष दुहेरीच्या अंतिम फेरीत धडक मारली आहे.

अंतिम फेरीत त्यांचा सामना तैवानच्या लिऊ यी आणि चीनच्या चेन बोयांग यांच्याशी होईल. उपांत्य फेरीत त्यांनी एमसी लू आणि तांग काई वेई या तैवानच्या जोडीवर २१-११, २१-१२ असा सरळ सेटमध्ये विजय मिळवला. महिला दुहेरीत भारताच्या तनिषा कॅस्ट्रो आणि अश्विनी पोनप्पा या जोडीचा सामना आज संध्याकाळी थायलंडच्या आर.प्रजोंगजाई आणि जे.कितिथाराकुल यांच्याशी होणार आहे.

**<><><><><>**

आयपीएल टी-ट्वेटी क्रिकेट स्पर्धेत आज रॉयल चॅलेंजर्स बंगळुरुचा सामना चैन्नई सुपर किंग्स बरोबर होणार आहे. बंगळुरुच्या चिन्नास्वामी स्टेडिअमवर थोड्याच वेळात म्हणजे संध्याकाळी साडेसात वाजता खेळला जाणार आहे. चैन्नई सुपर किंग्सनं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करायचा निर्णय घेतला आहे.

**//<><><><><>//**